# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

पोलीस निरीक्षक बारामती शहर पोलीस स्टेशन

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** बारामती शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0288 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 24/07/2026 08:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिंनाक पासून):** 23/07/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 23/07/2026
**Time From (वेळेपासून):** 15:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 24/07/2026 **Time (वेळ):** 08:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 24/07/2026 08:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बारामती एस टी स्टडचे समोरील ब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री संतोष बुधा पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,बारामती शहर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,बारामती शहर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9892753374

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल तुकाराम बनकर | | | 1. पणदरे पणदरे एस टी स्टँडच्या, अलीकड कनलच्या जवळ , ताबारामती जि पुणे,बारामती शहर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 4,00,000/ रूपये. | 400,000.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

400,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.24/07/2026.

मी संतोष बुधा पाटील वय 45 वर्षे पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा.क्र. 9892753374.

आज रोजी समक्ष हजर राहून सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देतो की, दि.20/07/2026 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालियात कार्यालयीन कामकाज करीत असताना आमचे वरिष्ठ पोलीस उपअधीक्षक (प्रशासन) श्री सतिश वाळके यांनी सुमारे 11.50 वाजता त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी उपस्थित असलेले तक्रारदार श्री. अनिल कानाराम बिशनोई, वय 26 शिक्षण 10वी धंदा- व्यापार, रा. ज्ञानाई बंगला के/ऑ ज्ञानेश्वर धुमाळ यांचेकडे किरायाने मान रोड म्हाळुंगे पुणे, मुळ रा. खारा, फलोदी, ता फलोदी जि फलोदी राज्य -राजस्थान यांची ओळख करून दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत असलेली तक्रार घेवून त्याप्रमाणे पुढील पडताळणी व सापळा कारवाई करा असे आदेश दिले. तसेच सदर कारवाईकामी सापळा पथकामध्ये पोशि 1966/प्रविण तावरे, पोशि 9175/ अश्विन कुमकर, मपोशि 7934 माकर व शासकीय वाहन इर्टीगा क्र एस एच 12 यु सी 4109 त्यावरील चालक पोशि 10674/माळी असे मदतीस दिले. तसेच गोपनिय कारवाईकरीता यापुर्वीच भविष्य निर्वाह निधी पथक, शिक्षण विभाग, कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे कार्यालयाकडील हजर असलेले पंच साक्षीदार श्री. देवीदास निवृत्ती सरोदे पद - वरिष्ठ लिपीक व श्री अरविंद मधुकर मोरे पद - वरिष्ठ लिपीक असे उपलब्ध करून दिले. त्यानंतर आम्ही तक्रारदार बिशनोई व सापळा पथक यांना आमचे कक्षात घेवून गेलो असता नमूद पंच साक्षीदार देखील आमचे कक्षात 12.30 वा. हजर झाले. मी उपस्थित सर्वांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली.

त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार बिशनोई यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा केली असता तक्रारदार बिशनोई यांनी त्यांना मराठी भाषा वाचता व बोलता येते, समजते परंतु लिहता येत नाही म्हणून त्यांची तक्रार त्यांनी सांगितलेप्रमाणे टाईप करुन द्या अशी विंनती केली. त्यानंतर तक्रारदार बिशनोई यांनी त्यांची तक्रार हिंदी व मराठीमध्ये तोंडी सांगितली ती मी संगणकावर मराठीत टंखलिखित केली ती पुढीलप्रमाणे – “मी विंनती तक्रारी अर्ज करतो की, स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमीटेड , मंबई -8 यांच्या बारामती शाखेच्या नविन इमारतीमधिल फर्निचरचे काम त्यांच्याकडील संचालक मंडळ मंजुर ठराव क्रं. 51 दिंनाक 25/08/2025 प्रमाणे माझ्या जित वुडन फर्निचर फर्मने 48,60,455 रुपये किंमतीचे काम आदेशाप्रमाणे पुर्ण केलेले आहे. त्याचे बिल 48,60,455 रुपये एवढे झालेले आहे. तसेच त्यांच्या सदर इमारतीमधे लाईट, सेफटी डोर, पीओपी, पडदे, कारपेट, रंगकामाचे अजुन इतर काम केलेले असुन त्याचे एकुण बिल 4,98,000/- एवढे झाले आहे.

वर नमुद कामांपैकी मला 48,60,455/- रुपयांच्या कामाच्या बिलाचे 40,00,000/- रुपये मला माझ्या बँक खात्यावर मिळालेले असुन सदर बिलापैकी उवर्रीत 8,60,455/- रुपये मिळणे मला बाकी आहे. तसेच इतर केलेले 4,98,000/- रुपयांचे कामाचे बिल देखील मिळणे बाकी आहे. सदर प्रलंबित बिलापैकी 8,60,455/- रुपये रकमेची बिलं संचालक श्री. अनिल बनकर यांनी मुंबई हेड ऑफीस मधुन पास करुन आणले असुन ती ऑर्डर त्यांच्याकडे आहे. ती ऑर्डर बँकेत जमा केल्यावरच मला माझ्या खात्यावर बिलाची रक्कम जमा होणार आहे. म्हणुन मी दिंनाक 18/07/2026 रोजी दुपारी 12.30 वा. च्या सुमारास बारामती येथे स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमीटेड , मुंबईचे संचालक श्री. अनिल बनकर यांना भेटण्यासाठी गेलो असता ते मला बसस्टँन्डजवळील एका चहाच्या दुकानावर भेटुन त्यांना मी माझे प्रलंबित बिलाच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी मला उर्वरीत 8,60,455/- रुपये रकमेचा मंजुरी आदेश आणल्याचे सांगुन तो आदेश बँकेत देणेसाठी 4,00,000/- रुपये आणी दुसरे केलेले 4,98,000/- रुपयांच्या कामाच्या बिलासाठी 1,00,000/- रुपये असे एकुण 5,00,000/- रुपये रकमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना एवढे पैसे कशाचे असे विचारले असता त्यांनी 5 लाख नाही दिले तर तुझी



Scanned with OKEN Scanner

मंजुर बिल ऑर्डर बँकेत देणार नाही बाकी तुझे बिल अडवुन ठेवीन असे सांगीतले. त्यावर सदरची रक्कम लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे एवढे पैसे नसल्याने मी त्यांना उद्या बोलतो असे सांगुन मी पुणे येथे परत आलो. यानंतर श्री. अनिल बनकर यांना काल दिंनाक 19/07/2026 रोजी माझा व्हाटसप नंबर 6377464865 यावरुन संध्याकाळी 4.52 वा. त्यांचा व्हाटसप नंबर 9960066544 यावर मेसेज केला असता त्यांनी मला व्हाटसप कॉल केला परंतु तो मिस झाल्यामुळे मी त्यांना पुन्हा 05.46 वा. कॉल करुन माझ्या बिलाची रक्कम लवकर मिळावी म्हणुन विंनती केली असता त्यांनी मला कल जो बोला 5 लाख उससे एक रुपया भी कम नही होगा, कल तुम पैसे लेके आजो मै सॅन्शन लेटर बँक मे जमा कर दुगां, तुम्हारा बिल जमा हो जायेगा असे बोलुन पुन्हा 5,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन आज रोजी पैसे घेवुन बोलवले आहे. तरी श्री. अनिल बनकर , संचालक, स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमीटेड, मुंबई यांनी माझ्याकडे मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याने व ती मला देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग येथे त्यांचे विरुध्द तक्रार देत आहे. श्री. अनिल बनकर साहेब व माझे कोणतेही आर्थिक वाद विवाद नसुन आमचेत कोणतेही भांडण तंटे अथवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कारवाई होणेस विंनती आहे." याप्रमाणे तक्रार टंकलिखीत करून झाल्यानंतर तीची प्रिंट काढली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार वाचुन त्यावर स्वाक्षरी केली. सदर तक्रार मी व दोन्ही पंचांनी देखील वाचली. त्यानंतर सदर तक्रारीवरून करण्यात येणा-या पुढील पडताळणी व सापळा कारवाई कामी पंच क्र.1 म्हणून श्री सरोदे व पंच क्र.2 म्हणून श्री मोरे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दोन्ही पंचांनी व मी तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार, दोन्ही पंच यांना लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालयाकडून करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत माहिती देत असता तक्रारदार यांना लोकसेवक अनिल बनकर यांचा फोन आला. सदर कॉल रेकॉर्ड करणे आवश्यक असल्याने प्रथम तक्रारदार व दोन्ही पंचांची पडताळणी निवेदने घेण्याचे सर्वानुमते ठरविले. त्याकरीता मी आमचेकडील ट्रॅपबॅग साहित्यामधून सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये नवीन सिंलबद पाकिटामधील मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस M ROCK Micro SD HC I 32 GB C10 व मागील बाजुस MCP-XY05/26 CE MMC32AX215FT5-T0 XYF 2605 MADE IN TAIWAN असे छापलेले होते ते व्हॉईस रेकॉर्डमध्ये घातले. पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत करतेवेळी त्याचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार असल्याने मी ट्रॅपबॅगमधील सोनी कंपनीचा व्हिडीओ रेकॉर्डर काढून त्यामध्ये नवीन सिंलबद पाकिटामधील मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस M ROCK Micro SD C10 HC 8 GB व मागील बाजुस MR-XY1/26 CE MMC08AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे छापलेले होते ते पंचाना दाखवुन व्हिडीओ रेकॉर्डमध्ये घातले. त्यानंतर माझे सुचनेवरून पोशि तावरे यांनी 14.39 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री बिशनोई व त्यानंतर पंच क्रं 1 श्री. सरोदे व पंच क्रं. 2 श्री मोरे यांची पडताळणी कारवाई करीताची निवेदने व्हाईस रेकॉर्डरद्वारे त्यामधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केली व व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. सदरवेळी मपोशि माकर यांनी त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे चित्रिकरण केले.

लोकसेवक बनकर यांचा तक्रारदार यांना फोन येवुन गेल्याने तक्रारदार श्री. बिशनोई यांनी त्यांचा मो क्र 6377464865 वरुन लोकसेवक श्री बनकर यांना त्यांचे मो क्र 9960066544 वर साधा कॉल लावुन स्पिकर ऑन करुन बोलणे करण्याचे व तक्रारदार यांनी त्यांना येण्याकरीता उशिर होण्याचे कारण त्यांची दुचाकी खराब झाल्याचे सांगावे असे सर्वानुमते ठरविले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवक यांना 14.52 वा.फोन करून फोनचा स्पीकार ऑन केला असता लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांचा कॉल घेतला व तक्रारदार यांना कुठे आले अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी त्यांची दुचाकी खराब झाल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना एसटी किंवा कारने या असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे बिलाचा कागदोपत्री प्रकिया पुर्ण करून घेण्याची विंनती केली असता लोकसेवक बनकर यांनी तुम्ही आल्याशिवाय काहीही होणार नाही असे सांगितले त्याकरीता तुम्ही लवकर येण्याचा प्रयत्न करा असे सांगितले असता तक्रारदार यांनी ठिक आहे असे सांगुन फोन कट केला.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना पुढील करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली व त्यानंतर सापळा पथक, दोन्ही पंच साक्षीदार व तक्रारदार असे शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 या शासकीय वाहनाने सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेल्या साहित्यासह 15.35 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन रवाना झालो. वाटेत सुमारे 15.59 वाजता पुन्हा लोकसेवक बनकर यांचा तक्रारदार यांना फोन येवून गेल्याने तक्रारदार यांनी त्यांचे नमूद मोबाईल क्रमांकावरुन लोकसेवक यांचे नमूद मोबाईल क्रमांकावर फोन केला असता संपर्क होवून लोकसेवक यांनी तक्रारदार यांना साडे चार वाजेपर्यंत येण्यास सांगितले. तक्रारदार यांनी त्यांची दुचाकी खराब झाल्याचे कारण देवून साडेचार वाजेपर्यंत पोहचू शकणार नसल्याचे सांगितले. त्यावर



Scanned with OKEN Scanner

लोकसेवक बनकर यांनी तुम्ही आल्याशिवाय कोणतेच काम होणार नाही व बिलाची जमा झालेली रक्कम (लाचेची ) काढण्याकरीता तक्रारदार यांचे व्हाऊचरची (तक्रारदार यांचे खाते त्याच बँकेच्या शाखेत असल्याने ) आवश्यकता असल्याचे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी ठिक आहे असे बोलून फोन कट केला. आम्ही सर्व पुणे सोलापुर हायवे मार्गे पाटसवरून पालखी महामार्गाने बारामती शहरामध्ये दाखल होवून बारामती - नीरा रोड येथील बारामती स्मशान भुमी या ठिकाणी सुमारे 17.54 वाजता पोहचलो.

त्यानंतर मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना पुढील पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. सदरवेळ ही बँक बंद होण्याची वेळ असल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक यांना साध्या कॉलद्वारे 18.32 वा. फोन केला असता त्यांचा फोन बिझी आल्याने संपर्क झाला नाही. त्यानंतर सुमारे 18.33 वाजता लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना कॉल केला असता तक्रारदार यांनी तो रिसिव्ह केला. त्यामध्ये झालेल्या चर्चे दरम्यान लोकसेवक बनकर यांनी बँक बंद झाल्याने आता काही होणार नाही तसेच लोकसेवक बनकर हे कुटुंबासह बाहेर गेले असून ते सदर दिवशी मुंबईला जावून गुरुवारी परत येणार असल्याचे सांगुन तक्रारदार यांना गुरूवारी या असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचेत तक्रारदार यांचे प्रलंबित बिलाचे संदर्भाने चर्चा होवून फोनवरील बोलणे संपले. सदरचे दोन्ही कॉल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये पोशि तावरे यांचेकरवी ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहेत. लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना गुरूवारी बोलाविले असल्याने दि.20/07/2026 रोजीची पडताळणी कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून दि.23/07/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता सापळा पथक व दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि. पुणे कार्यालातील माझे कक्षात हजर झाले. तक्रारदार यांना रहदारीमुळे कार्यालयात येण्यास उशीर होवुन ते 11.35 वाजता हजर झाले. त्यानंतर आम्ही सर्वजण चालक पोशि माळी सह शासकीय वाहन क्र. एमएच 12 युसी 4109 ने सापळा कारवाईकामी आवश्यक साहित्यासह ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन 11.54 वाजता रवाना झालो. वाटेत सुमारे 12.38 वाजता तक्रारदार यांना लोकसेवक यांचा व्हॉटसप मिसकॉल तसेच 12.41 व 12.42 वाजता साधे कॉल येवून गेले. लोकसेवक यांचे तक्रारदार यांना येणारे कॉल रेकॉर्डींग करणे आवश्यक असल्याने तक्रारदार व दोन्ही

पंचांची निवेदन घेण्याचे सर्वानुमते ठरवून माझे सुचनेप्रमाणे पोशि तावरे यांनी व्हॉॅईस रेकॉर्डरद्वारे 12.44 वाजता तक्रारदार व दोन्ही पंचांची पडताळणी निवेदने शासकीय वाहनामध्ये ध्वनिमुद्रीत केली. सदरवेळी मपोशि माकर यांनी त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे चित्रिकरण देखील केले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे वर नमूद मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक बनकर यांचे नमूद मोबाईल क्रमांकावर स्पीकर ऑन करून सुमारे 12.56 वाजता साधा कॉल केला असता लोकसेवक यांनी सदर कॉल रिसिव्ह केला असता लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना उशिर न करता लवकर येण्याबाबत सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी दुपारी अडीच वाजता बारामती येथे पोहचणार असल्याचे लोकसेवक यांना सांगितले. सदर कॉल पोशि तावरे यांचे माफर्तीने व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर सुमारे 14.30 वाजता आम्ही सर्वजण शासकीय वाहनाने पेन्सिल चौक, बारामती येथे पोहचलो. तक्रारदार यांना पडताळणीकामी जाण्यासाठी दुचाकी वाहनाची आवश्यकता असल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मित्राची दुचाकी होन्डा अँक्टीव्हा क्र. एमएच 42 बीटी 1339 ही उपलब्ध करून घेतली. त्यानंतर तक्रारदार सदर दुचाकीसह व इतर सर्वजण शासकीय वाहनाने बारामती - इंदापुर रोडलगतच्या मोतीबाग परिसरातील अजिंक्य बजार दुकानाचे बाजूस असलेल्या कच्च्या रस्त्यालगत आडोशाला सुमारे 14.58 वाजता पोहचलो. लोकसेवक बनकर यांनी बारामतीमध्ये पोहचल्यानंतर कॉल करा असे सांगितल्याने 15.00 वाजता तक्रारदार यांनी लोकसेवक बनकर यांना साधा कॉल केला असता संपर्क झाला. त्यावेळी लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना एस टी च्या बारामती शाखेच्या बँकेत बोलाविले. सदर कॉल पोशि तावरे यांचे मार्फतीने व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करणेत आला. त्यानंतर मी तक्रारदार, पंच व सापळा पथकास दि.20/07/2026 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान दिलेल्या सुचनांची उजळणी केली.

त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी 15.06 व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालु करून तक्रारदार बिशनोई यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बनियानला कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने लावुन तक्रारदार यांना त्यांचेकडील दुचाकी क्र. एमएच 42 बीटी 1339 ने पंच क्र.1 श्री सरोदे यांचेसोबत पडताळणी कारवाईकरीता त्याचवेळी केले व मी उर्वरित पथक व पंच क्र.2 यांचेसह शासकीय वाहनात सदर ठिकाणी थांबून राहिलो. काही वेळानंतर पंच क्रं. 1 व तक्रारदार सापळा पथकाजवळ परत आले तेव्हा तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 15.44 वाजले होते. त्यावेळी मी पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, “मी व तक्रारदार असे

तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने बारामती एसटी स्टँड इमारतीचे पहिल्या माळयावर असलेल्या एसटी को.ऑप. बँक, बारामती बस स्टॅन्ड येथे गेलो असता लोकसेवक त्यांचे कॅबिनमध्ये उपस्थित नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून 15.15 वाजता लोकसेवक यांना स्पिकर ऑन करुन साधा कॉल केला. त्यावेळी लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना 15-20 वीस मिनिटामध्ये येतो असे सांगितले. त्यामुळे मी व तक्रारदार असे लोकसेवक बनकर यांचे कॅबिनमध्ये त्यांची वाट पाहत बसून राहिलो. सुमारे पंधरा मिनिटानतर लोकसेवक बनकर त्यांचे कॅबिनमध्ये आले. त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक यांचेत तक्रारदार यांचे प्रलंबित बिलाचे संदर्भाने चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक बनकर तक्रारदार बिशनोई यांना “कितना हैं...तेरेको....तेरे को चार लाख देना है ना मेरे को आज” असे बोलले असता तक्रारदार यांनी फक्त फर्निचरचे बिल करणार , बाकी लाईट व रंगाच्या बिलाचे काय असे विचारले असता त्यांनी ते नंतर करतो असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांनी “मेैं तो तेरेको दो ही देणेवाला था....लेकीन क्या हैं तु क्या हैं ना बोहत दया- वया कर रहा हैं...तु बहुत बडा टेंपर... टेंशन दे रहा हैं मेरेको....जाने दो चोड दो....इसिलीये मेंने उसको तुमको ज्यादा नही बोला” असे बोलून फर्निचरचे जे बिल सुमारे आठ लाख बिल काढणार त्यापैकी सहा लाख तक्रारदार यांच्या व्हाऊचर (पैसे काढण्याची स्लीप)ने काढून तक्रारदार यांना फक्त दोन लाख रुपये ठेवणार असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे खात्यामध्ये जमा होणा-या बिलाचे रकमेचे अगावू चैक त्यांचे लेबर, मिस्त्री, हार्डवेअरवाला यांना देवून ठेवल्याचे सांगुन त्यांचे बँक अकाऊंटवरून व्हाऊचरद्वारे पैसे काढण्यास लोकसेवक यांना नकार देवून तेवढी रक्कम रोख स्वरुपात कोणाकडून अँडजस्ट करून देतो परंतु सदर लाच रक्कम 4,00,000/- रुपयांपैकी काहीतरी रक्कम कमी करा अशी विंनती लोकसेवक यांना केली. परंतु चर्चा करून देखील लोकसेवक त्याकरीता तयार नसतात त्यामुळे “थांबवायला सांगा .....ते काय एैकत नाही.... थांबवायला सांगा” असे बोलून तक्रारदार यांचे बिलाचे काम एमडी साहेबांना थांबवायला सांगा असे त्यांच्या अधिनस्त कर्मचा-याला बोलले. त्यावर तक्रारदार “कितना लाके दुं.....अभी कितना लाके दुं अभी” असे बोलून लोकसेवक यांना चार लाख रकमेमध्ये कमी करण्याची पुन्हा विंनती करतात त्यावर लोकसेवक “अभी साडे चार लाख जमा करो....चार लाख साठ हजार” तक्रारदार यांना लोकसेवक बनकर यांनी लाच रक्कम वाढवून सांगीतल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक बनकर यांना “नही अभी आप बढा दिये....आप बडा दिये अभी आप चार बोले और अभी आप बढा दिये” असे बोलून रक्कम कमी करण्याची विंनती केली असता लोकसेवक हे तक्रारदार यांना “चार साठ का करो....चलो हैं क्या उसमे” असे बोलले. त्यानंतर बराच वेळ तक्रारदार व लोकसेवक यांचेत लाच रक्कम कमी करणेबाबत तडजोड करण्याबाबत बोलणे झाले . काहीवेळाने लोकसेवक अनिल बनकर यांनी तक्रारदार यांना “चार कप्लींट करो...आज...फिर बाकी का बाद में देखेंगे” असे बोलले असता तक्रारदार यांनी “फिर चार होने के बाद में आगे वाले में कितना करना पडेगा” असे बोलले असता लोकसेवक तक्रारदार यांना “अरे बाद का बाद में सोचेंगे यार.....तुम मेरेको ना छे लाख कंप्लीट करो....कभीभी करो” असे बोलून लोकसेवक बनकर यांनी माझ्या समक्ष तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित बिल एसटी बँकेचे एम.डी. यांचेकडून काढून देण्यासाठी रु.6,00,000/- लाचेची मागणी करून तडजोडी अंती त्यापैकी रु.4,00,000/-लाचेची रक्कम एखाद तासात 16.30 वा. पर्यंत घेवून येण्यास सांगितले.” अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितल्यानतर मी तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी देखील पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये पडताळणी कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत संभाषणाची फाईल फास्ट रिंव्हस-फॉरवर्ड करुन ऐकुन तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याची खात्री केली.

झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित बिल एस.टी. बँकेचे एम. डी. यांचेकडून काढून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे रु.6,00,000/- मागणी करून तडजोडी अंती त्यापैकी रु. 4,00,000/-लाचेची रक्कम सुमारे 16.30 वा.पर्यंत घेवून येण्यास सांगितल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार मी तक्रारदार बिशनोई यांना लोकसेवक बनकर यांना देण्यात येणा-या लाचेची रक्कम हजर करण्याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी रु.4,00,000/- पैकी त्यांचे बचतीमधील रक्कम रु. 50,000/- (रु.500/-दराच्या भारतीय चलनातील एकुण 100/- नोटा) आमचे समक्ष हजर केल्या असता सदर नोटांचे नंबर मपोशि माकर यांनी एका को-या कागदावर लिहून घेतले. सदर पन्नास हजाराच्या ख-या नोटा व उर्वरित रक्कम तक्रारदार यांचेकडे नसल्याने पाचशे रुपयांच्या खेळण्यातील 500 नंबर असलेल्या 700 नोटा उपलब्ध करुन घेवुन त्यामध्ये समाविष्ठ करून लाच रक्कम लोकसेवकास देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्या दरम्यान तक्रारदार यांना लोकसेवक यांचा फोन येवून गेल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक बनकर यांना सुमारे 16.48 साधा फोन कॉल केला असता लोकसेवक बनकर यांनी फोन रिसिव्ह करून तक्रारदार यांना लवकर येण्यास सांगितले. सदरचा कॉल पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केला.

त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे चालक पोशि माळी यांनी शासकीय वाहनामध्ये तक्रारदार व दोन्ही पंचांना



Scanned with OKEN Scanner

अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रासिन पावडर नेहमीच्या प्रकाशामध्ये पाहीली असता तिचेवर कोणतीही चकाकी दिसून येत नाही परतु अंधारामध्ये तिचेवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता तिचेवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून येते. पोशि माळी यांनी त्याबाबतची प्रात्यक्षिके देखील करून दाखविली. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या ख-या नोटांना व खेळण्यातील नोटांना पोशि माळी अँथ्रासिन पावडर लावली. सर्व रक्कम रबरच्या सहाय्याने एकत्र पॅक करून लोकसेवकास संशय येवू नये म्हणून पॅक केलेले नोटांचे बंडल वर्तमान पत्राचे कागदामध्ये रबराचे सहाय्याने पॅक केले. त्यावर देखील अँथ्रासिन पावडर लावली. त्यानंतर सदर पॅक केलेल्या नोटां एका जांभळया रंगाच्या सिंथेटीक प्लॉस्टीकच्या पिशवीमध्ये ठेवल्या व सदर पिशवी तक्रारदार यांची दुचाकीच्या सिट खालच्या डिक्कीमध्ये पोशि माळी यांनी ठेवली. त्यानंतर पोशि माळी यांना सापळा कारवाईतुन वगळण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच साक्षीदार यांची सापळा कारवाईकरीताची सापळा निवेदने पोशि तावरे यांचे मार्फतीने व्हॉईस रेकॉर्डद्वारे सुमारे 17.18 वाजता ध्वनिमुद्रीत करण्यात आली. त्यानंतर सुमारे 17.32 वाजता तक्रारदार यांना लोकसेवकाचा साधा फोन कॉल आला असता तक्रारदार यांनी तो घेतला. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना लवकर येण्यास सांगितले. त्यामुळे मी पुन्हा तक्रारदार, दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवकाकडून लाच रक्कम स्वीकाल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे डाव्या हाताने त्यांचे डोक्याचे केसांवरून हात फिरवून आंम्हास दिसेल अश्या पद्धतीने लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.  बँक बंद होण्याची वेळ होत आल्याने लोकसेवक बँकेमध्ये आहेत किंवा कसे याकरिता सर्वानुमते ठरविल्याप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवक बनकर यांना सुमारे 17.55 वाजता साधा फोन कॉल केला असता लोकसेवक बनकर यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवून बँकमध्ये येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही रवाना होणार असतांना लोकसेवकाने तक्रारदार यांना 18.00 वा. साधा फोन कॉल करुन तक्रारदार यांना बारामती एसटी स्टँडचे समोरील बारामती - इंदापुर रोडचे पलिकडे असलेल्या हॉटेल/स्वीट होम समोर येवून थांबण्यास सांगितले. सदर कॉल ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर मी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर 18.02 वाजता चालू करुन तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बनियान कोणासही संशय येणार नाही अशा रितीने लावला. त्यानंतर सर्वानुमते ठरविल्याप्रमाणे पंच क्र.2 व सापळा पथक असे मी शासकीय वाहन चालवण्यास घेवुन 18.05 वा. प्रथम रवाना होवून बारामती एस टी स्टॅंडचे पुर्वी उतरून पायी चालत एस डी स्टँडचे समोर असलेल्या श्रीराम स्वीट होमचे आजुबाजुस संशय येणार नाही अशा रितीने आंम्ही नेमुन दिलेल्या ठिकाणी सापळा लावून थांबलो. आमचे पाठोपाठ तक्रारदार व पंच क्र.1 हे तक्रारदार यांचेकडील दुचाकीने येवून स्वीटहोम/हॉटेल श्रीराम समोर येवुन थांबुन त्यांची दुचाकी पार्क केली. तक्रारदार व पंच क्र.1 सरोदे दुचाकीवरून खाली उतरून श्रीराम स्वीटहोमचे समोर उभे असलेल्या दोन इसमांजवळ गेले त्यांचेसोबत थोडी चर्चा केली त्यानंतर दोन्ही इसम पांढ-या रंगाच्या चारचाकी वाहन इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 मध्ये बसून इंदापुरच्या दिशेने निघुन गेले. तक्रारदार व पंच क्र.1 सदर ठिकाणी थांबून होते. त्यानंतर सदर इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 पुन्हा युटर्न घेवून परत आली व तक्रारदार व पंच क्र. 1 हे थांबलेल्या ठिकाणच्या विरुध्द बाजुस एसटी स्टँडचे समोर रोडवर थांबली. त्यावेळी तक्रारदार व पंच क्र.1 असे दुचाकीने सदर गाडीजवळ गेले व दुचाकी जवळच पार्क केली. त्यातील एक इसम खाली उतरला तक्रारदार यांचेशी बोलू लागला व त्यानंतर पुन्हा इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 मध्ये मधल्या सीटवर जावून बसला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे दुचाकीचे सीट खालच्या डिक्कीमध्ये लाच रक्कम ठेवलेली पिशवी बाहेर काढून इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 च्या मधल्या सीटवर जावून बसले. पंच क्र.1 सरोदे त्याचे सोबत सदर गाडीचे दरवाज्यावर हात ठेवून त्यांच्या जवळ उभे राहिले. काहीवेळातच तक्रारदार यांनी इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 मधुन त्यांचे डोक्यावरून त्यांचा डावा हात केसातुन फिरवून मला व सापळा पथकास पाहून लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा केला असता मी व सापळा पथक लागलीच इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 जवळ गेलो असता पंच क्र.1 यांनी मधल्या सीटवर बसलेला इसम हाच लोकसेवक बनकर असल्याचे सांगुन तक्रारदार यांनी पिशवीतुन वर्तमान पत्राने व रबरने पॅक केलेला लाच रक्कमेचा काढलेला बंडल लोकसेवक बनकर यांनी माझ्या समक्ष तक्रारदार यांचेकडून स्वीकारून तो ड्रायव्हर सीटपाठीमागील सीट कव्हरची चैन उघडून त्यामध्ये ठेवल्याचे सांगितले.

त्यानंतर मी व सापळा पथक असे पंच क्र.2 श्री मोरे यांचेसह लागलीच इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 चे मधले सिटवर बसलेल्या लोकसेवक बनकर यांना पकडले. मी लोकसेवक बनकर यांचा उजवा हात व पोशि तावरे यांनी डावा हात मनगटाचे वर घट्ट पकडला. त्यावेळी मपोशि माकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद केला. ती वेळ 18.19 वाजताची होती. तक्रारदार इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 चे बाहेर उतरुन बाजूला जावुन थांबले. त्यानंतर मपोशि माकर यांनी त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ शुटींग चालू केले. त्यावेळी



Scanned with OKEN Scanner

लोकसेवक बनकर आरडाओरड करून प्रतिकार करून लागले. त्यांना मी माझे ओळखपत्र दाखवुन सापळा पथकाचा परीचय देवुन त्यांचे नांव विचारता त्यांनी आपले नांव अनिल बनकर असे सांगीतल्यावर त्यांना आम्ही होत असलेल्या कारवाई बाबत त्यांना विश्वासात घेवुन माहिती दिली. लोकसेवक बनकर यांना आम्ही ते बसलेले इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 मधेच कृत्रिम अंधारामध्ये अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये दोन्ही पंच, सापळा पथक व माझे हाताची तपासणी करून दाखविली असता कोणाच्याही हाताला अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली नाही. लोकसेवक बनकर यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ड्रायव्हर सिटच्या मागील कप्प्यात रक्कम ठेवलचे सांगुन सदर कप्प्याची चैन उघडुन देण्यास नकार दिल्याने आमचे सुचनेवरून पंच क्र.2 यांनी सदर इरटिगा क्र. एमएच 42 बीई 5787 चे ड्रायव्हर सीट पाठीमागील सीट कव्हरची चैन उघडून त्यामध्ये लाच रक्कमेचा वर्तमान पत्राने व रबराने पॅक केलेला बंडल काढून समक्ष हजर केला. त्यात 500 रुपये दराचे 100 ख-या नोटा व 500 रुपये दराच्या 700 खेळण्यातील नोटा अशी लाच रक्कम दिसुन आली. तसेच सदर लाचेच्या नोटांची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर लोकसेवक बनकर यांची दोन्ही पंचासमक्ष अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता त्यांचे डाव्या हाताचे तळ हात व सर्व बोटांचे पे-यांना तसेच सदर इरटिगा कारचे ड्रायव्हर सीटचे पाठीमागील बाजुच्या सीट कव्हरच्या चैनीच्या कप्प्याचे आतील बाजुस अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर सदर इरटिगा कारमध्ये आलोसे बनकर यांचेकडून हस्तगत केलेल्या रकमेतील ख-या नोटांचे व त्यांचेकडील नोट नंबर लिहलेल्या कागदावरिल नोट नंबरची पंच क्र.1 यांचे मदतीने तपासणी केली असता सर्व नंबर तंतोतंत जुळून आले. त्यानंतर मी तक्रारदार यांना सदर गाडीमध्ये बोलावून लोकसेवक बनकर यांचे समक्ष कृत्रिम अंधारामध्ये अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तक्रारदार यांचे कपडे व हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे तळ हात व सर्व बोटाचे पे-यांना अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. सदर वेळी लोकसेवक यांचे सोबत असणारा चालक सिटवर बसलेला व्यक्ती त्यांचा मुलगा असल्याचे समजले. त्यांचा सदर कारवाई दरम्यान प्रथम दर्शनी काहीएक सहभाग नसल्याचे निंदशनास आल्याने त्यांना झालेल्या कारवाईची माहीती देवुन सहकार्य करण्यास सांगीतले.

सदर कारवाई वेळी रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा होत असल्यामुळे जागीच वाहत्या रस्त्यावर पुढिल कारवाई करणे संयुक्तीक व रहदारीमुळे धोक्याचे होत असल्याने सदर ठिकाणच्या चर्तु:सिमा घेवून लोकसेवक बनकर यांना पुढील कारवाईकामी बारामती शहर पोलीस ठाणे येथे घेवून आलो. त्यावेळी लोकसेवक बनकर यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता , पद याबाबत विचारणा केली असता त्यांचे नाव श्री अनिल तुकाराम बनकर वय 51 वर्षे, पद- वाहतुक नियंत्रक नेमणुक- बारामती एमआयडीसी डेपो तसेच संचालक एस.टी.को.ऑप.बँक, मुंबई रा. मु.पो.पणदरे (पणदरे एस टी स्टँडच्या अलीकड कॅनॉलच्या जवळ) ता.बारामती जि. पुणे मोबा.क्र.9960066544 असे सांगितले. त्यानंतर मी पंच क्र.1 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सापळा कारवाईकरीता तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने रवाना झालो त्यावेळी सुमारे 18.07 वाजता लोकसेवक यांचा तक्रारदार यांना ते कुठे आलेत याबाबात विचारण्याकरीता साधा फोन कॉल आला. तक्रारदार यांनी त्यांना माहिती दिली. त्यानंतर आम्ही बारामती एस टी स्टँडचे विरुध्द बाजुस बारामती -इंदापुर रोडचे पलिकडे असलेल्या श्रीराम स्वीटहोम समोर पोहचलो असता तेथे लोकसेवक बनकर एका इसमासोबत हजर होते. त्यावेळी लोकसेवक बनकर व तक्रारदार बिशनोई यांचेत तक्रारदार यांचे प्रलंबित बिलाचे संदर्भाने चर्चा झाली. तसेच लोकसेवक बनकर यांचे सोबत असलेला इसम हा त्यांचा मुलगा असल्याचे लोकसेवक यांनी सांगितले. त्यावेळी लोकसेवक बनकर हे सदर ठिकाणी कॅमेरा असल्याचे सांगुन तक्रारदार व मला त्यांनी आणलेल्या इरटिगा कारमध्ये बसण्यास वारंवार सांगत होते. तक्रारदार यांनी त्यांना भीती वाटत असल्याचे कारण देवून आपले सुचने प्रमाणे गाडीमध्ये बसण्यास नकार दिला. त्यामुळे लोकसेवक बनकर यांनी मला व तक्रारदार यांना त्यांचे गाडीचे पाठीमागे दुचाकीने या असे सांगुन ते दोघे त्यांचे इरटिगा कारमध्ये बसून इंदापुरचे दिशेने हायवेने निघून गेले. आपण पुर्वी दिलेल्या सुचनेमुळे मी व तक्रारदार दुचाकीवर बसून सदर ठिकाणीच थांबून राहिलो.

आम्ही त्यांचे पाठोपाठ येत नाही हे त्यांनी पाहिंल्यानतर ते पुन्हा यु टर्न करून आम्ही थांबलेल्या विरुध्द बाजुस आम्हाला समांतर येवून थांबले. आंम्ही दोघे दुचाकीने त्यांचे गाडीजवळ गेलो. त्यावेळी लोकसेवक बनकर त्यांचे गाडीतुन उतरून तक्रारदार यांचे जवळ आले व गाडीत बसा असे तक्रारदार यांना बोलू लागले. तक्रारदार गाडी बसण्याकरीता तयार नसल्याने लोकसेवक यांचा मुलगा गाडी बंद करून खाली उतरून थांबला. त्यावेळी तक्रारदार गाडीमध्ये बसण्यास तयार झाले. त्यावेळी लोकसेवक बनकर प्रथम सदर इरटिगा कारचे मधल्या सीटीवर जावून बसले. त्यामुळे तक्रारदार देखील त्यांचे दुचाकीचे सीटचे खाली असलेल्या डिक्कीमधील लाच रक्कमची पिशवी काढून सदर गाडीच्या मधल्या सीटवर लोकसेवक बनकर यांचे अलीकडे जावून बसले. त्यावेळी त्यांचे जवळ जावून



Scanned with OKEN Scanner

पोलीस निरीक्षक
बारामती शहर पोलीस स्टेशन

दरवाज्याला हात लावून उभा राहिलो. त्यावेळी लोकसेवक यांनी "दरवाजा लगा....कितना है ये"असे तक्रारदार यांना विचारले असता तक्रारदार यांनी सदर नोटांचा पॅक केलेला लाच रकमेचा बंडल सदर पिशवीमधून काढून उजव्या हाताने लोकसेवक बनकर यांचे समोर धरून "चार लाख" असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना "में गिनता नही....तेरेपे◌ भरोसा है" असे बोलून सदर बंडल त्यांचे डाव्या हाताने माझ्या समक्ष स्वीकारून तो ड्रायव्हर सीटच्या पाठीमागील बाजुच्या कप्प्याची चैन उघडून त्यामध्ये ठेवला. त्यानंतर तक्रारदार यांनी "नही गिनना है तो गिनलो...वैसा कोई दिक्कत नही है" असे लोकसेवक यांना सांगितले असता लोकसेवक बनकर हे "नही.....तेरेपे भरोसा है....अगर कुच कम निकला ना मै तेरे को" असे तक्रारदार यांना बोलले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक "चार लाख में से ऐक रुपया कम नही है....मेरा काम अभी कब होगा वो बताओ" असे बोलून डावा हात डोक्याच्या केसांवर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला असता सापळा पथक व आपण येवून वरिलप्रमाणे पुढील कारवाई केल्याचे पंच क्र.1 यांनी सांगितले. त्यानंतर तक्रारदार बिशनोई यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्याबाबत मी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये सापळा कारवाईदरम्यान झालेल्या संभाषणाची ध्वनिमुद्रीत फाईल रिव्हस फॉरवर्ड करुन ऐकून खात्री केली. वरिल सर्व घटनेचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दि.23/07/2026 रोजी 15.06 ते 15.44 वाजता एसटी को.ऑप. बँक शाखा बारामती येथील आलोसे यांचे केबिन येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान यातील आलोसे श्री अनिल तुकाराम बनकर यांनी तक्रारदार श्री. अनिल बिश्नोई यांच्या जित वुडन फर्निचर फर्मने स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक लिमीटेड , मंबई -8 यांच्या बारामती शाखेच्या नविन इमारतीमधिल फर्निचरचे काम त्यांच्याकडील संचालक मंडळ मंजुर ठराव क्रं. 51 दिंनाक 25/08/2025 प्रमाणे 48,60,455 रुपये किंमतीचे काम आदेशाप्रमाणे पुर्ण केलेले असतांना एस टी को.ऑप.बँक, मुंबई बँकेच्या बारामती शाखेमध्ये केलेल्या फर्निचरच्या कामाचे उर्वरित 8,60,455 चे बिल तसेच इतर किरकोळ 4,98,000/- रु. चे बिल व पडताळणी दरम्यान डिपॉजीट 5,00,000/- रु. रक्कम एस टी को. ऑप.बँक, मुंबईचे एम.डी. यांचेकडुन मंजुर करवुन आणुन काढून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष रु. 6,00,000/- मागणी करून त्यापैकी तडजोडी अंती रु.4,00,000/- स्विकारण्याचे मान्य करुन घेवून येण्यास सांगुन सदर रु.4,00,000/- ही लाचेची रक्कम सापळा कारवाई दरम्यान पंच क्र.1 यांचे समक्ष बारामती एस टी स्टॅंडचे समोरील बारामती - इंदापुर रोडवर लोकसेवक यांची इर्टीगा गाडी क्र. एमएच 42 बीई 5787 हिचे मध्ये 18.19 स्वीकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988चे कलम 7 नुसार कायदेशीर फिंयाद आहे.

माझा वरील संगणकावर घेतलेला फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिंयादी जबाब दिला.स.ता.म.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
NAVNATH ANKUSH NALAWADE
**Rank (पद):** PC (Police Constable) **No.(क्र.):** 12201000359NA
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with OKEN Scanner

पोलीस निरीक्षक
बारामती शहर पोलीस स्टेशन
सत्यमेव जयते

पोलीस ठाणे अमलदार
बारामती शहर पोलीस स्टेशन

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shirshail chiwadchet
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner